आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत (TCS) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या राष्ट्रीय कुष्ठरोग निमूर्लन कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेला केंद्र हिस्सा निधी वितरीत करणेबाबत...
लेखाशिर्ष (२२१० F७८३)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८ /प्र.क्र.०५ /कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: -२५ मार्च, २०१९.

<u>वाचा -</u>

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग समक्रमांक दि.१९.१०.२०१९
३) सार्वजनिक आरोग्य विभागाची नस्ती क्र.एनएचएम - ०६१८ /प्र. क्र. २८८/आ-०७.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (२२) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम (केंद्र हिस्सा), (२२१० F७८३), ३१ -सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु.५१.४३ लाख इतका निधी सन २०१८-१९ या वर्षात अर्थसंकल्पित आहे. सदर तरतुदीतून रु. ३१.०० लाख इतका निधी संदर्भीत वाचा क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागास वितरीत करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावानुसार केंद्र शासनाने उपरोक्त योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा प्रलंबित रु. ६०५.०० लाख इतका निधी वितरीत केलेला असुन सदर निधी राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा असल्याचे वित्त विभागाने प्रमाणित केले आहे. सबब, केंद्र शासनाकडून आदिवासी घटक कार्यक्रमासाठी (TCS) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना व कार्यक्रम याकरिता प्राप्त झालेला रु.६०५.०० लाख इतका निधी (०१) (२२) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम (केंद्र हिस्सा), (२२१० F७८३), ३१ -सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. प्रकरणी विभागप्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; तसेच आदिवासी विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल

याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ३१९ /अर्थोपाय, दि. १२-०६-२०१८ व अनौपचारिक संदर्भ क्र. ६६ /२०१९/व्यय-१३, दि. ४-०१-२०१९ अन्वये दिलेल्या मंजूरीस अधिन राहून निर्गमित करण्यात येत असून संदर्भाधीन शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची सार्वजनिक आरोग्य विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५११०३१८०८२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.25 15:48:35 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३) सर्व जिल्हाधिकारी,महाराष्ट्र राज्य
४) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई
५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६) महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७) विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
८) अधिदान व लेखधिकारी,मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

११) सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य-६), मंत्रालय, मुंबई

१२) कार्यासन अधिकारी (का.८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.